| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | : | १६/०७/२००९ |
| नोंदणी दिनांक | : | १६/०७/२००९ |
| निकाल दिनांक | : | ०७/०५/२०२६ |
| कालावधी | : | व. : म. : दि. |
| | | १६ : ०९ : २१ |

# सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, सावंतवाडी यांचे न्यायालयात

(पीठासीन अधिकारी–श्रीमती.आर.जी.कुंभार)

**नियमित दिवाणी मुकदमा क्र. ५७/२००९** **नि.क्र. ८५**

**MHSI**06–000541–2009

श्री. व्हिसेंट डॉमनिक घोन्साल्विस, ]
वय– ५९ वर्षे, धंदा– व्यापार, ]
रा. घर नं. ११५अ, भोमवाडी, खालचावाडा, ]
ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग. ]
तूर्त रा. रुम नं.५३, जहागिर बाग, ]
आशिर्वाद बिल्डींगमागे, स्वातंत्र्यवीर ]
सावरकर मार्ग, शिवाजी पार्क, माहिम, १६. ] **... वादी.**

**विरुद्ध**

१. मारी अंतोनी घोन्साल्विस व. ६, ]
वय–६५ वर्षे, धंदा– घरकाम, ]
२. बाजील अंतोनी घोन्साल्विस, ]
वय–४८ वर्षे, धंदा– व्यापार, ]
३. सिरील अंतोनी घोन्साल्विस, ]
वय–४६ वर्षे, धंदा– व्यापार, ]
४. सिप्रियन अंतोनी घोन्साल्विस, ]
वय–३५ वर्षे, धंदा– व्यापार, ]
प्रतिवादी नं. १ ते ४ रा. घर नं. ११५अ, ]
रा.भोमवाडी, खालचावाडा, ]
ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग. ] ... **प्रतिवादी.**

५. श्रीमती फिलोमिना पाऊलू ब्रिटो, ]
वय–६० वर्षे, धंदा– घरकाम, ]
६. श्रीमती लुसी अंन्टोनी डिसोझा (मयत) ]
६अ. श्री. क्रिस्पीन अंन्टोनी डिसोझा, ]
वय–२७ वर्षे, धंदा– घरकाम, ]
६ब. श्रीम. ब्रेन्डा अंन्टोनी डिसोझा, ]
वय–३१ वर्षे, धंदा– नोकरी, ]
दोन्ही रा. बी/१४, ग्रीन लॉन बिल्डींग,]
पॅराडाईज सिनेमा समोर, के.बी. रोड, ]
माहिम, मुंबई ४०००१६. ] ... **प्रतिवादी.**

==========================================

**दावा– वाटप व पृथक कब्जा मिळणेकरीता.**

==========================================

वादीतर्फे विधीज्ञ श्री. आर.डि.आंबिये.

प्रतिवादी क्र. १ तर्फे विधिज्ञ श्री. बी.एन.प्रभू – विना कैफियत

एकतर्फा – प्रतिवादी क्र. २, ६अ व ६क

खारीज – प्रतिवादी क्र. ६ब

विना कैफियत – प्रतिवादी क्र. ३, ४ व ५

============================================

**–:: न्या य नि र्ण य ::–**

( दिनांक:– ७ मे, २०२६ रोजी घोषित.)

प्रस्तुतचा दावा वादीने सरस निरस धडेवाटप होवून पृथक कब्जा मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

**वादीचे कथन खालीलप्रमाणेः–**

०२. गाव मौजे भोमवाडी, ता.सावंतवाडी, ग्रामपंचायत हद्दीतील घर नं.११५अ हा दाव्याचा विषय असून सदरचा इमला हा वादी यांचे वडील डुमिंग अंतोन घोन्साल्विस यांचे

मालकी कब्जा भोग्याचा आहे. डुमिंग अंतोन घोन्साल्विस हे सन १९६७ रोजी मयत झाले. त्यांना खालीलप्रमाणे वारस आहेत.

डुमिंग अंतोन घोन्साल्विस (वडील मयत १९६७)

↓

लुईजा डुमिंग घोन्साल्विस (पत्नी मयत १९९४)

↓

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अंतोनी मयत १९८३ | फ्रांन्सीस मयत निरवंश | व्हिसेंट वादी | फिलोमिना प्रतिवादी नं.५ | लुसी प्रतिवादी नं. ६ |

↓

मारी (पत्नी)
प्र.वादी नं. १

↓

बाजील
प्र.वादी नं. २

↓

सिरील
प्र.वादी नं. ३

↓

सिप्रियन
प्र.वादी नं. ४

०३. प्रतिवादी क्र.१ ही वादीचा मयत भाऊ अंतोनी डॉमनिक घोन्साल्विस याची पत्नी असून प्रतिवादी क्र. २,३,४ हे त्यांचे मुलगे आहेत. प्रतिवादी क्र. ५ व ६ या वादीच्या बहिणी आहेत. फ्रान्सिस घोन्साल्विस हे निरवंश मयत झालेले आहेत. दावा इमला हा वादीची आई लुईजा डॉमनिक घोन्साल्विस हीचे नावे ग्रामपंचायत भोमवाडी नमुना नं.८ ला नोंद होते वादीची आई ०४/१२/१९९४ रोजी मयत झालेवर प्रतिवादी नं. १ हिने ग्रामपंचायत

भोमवाडी यांचेकडे वारस तपासाची खोटी नोंद देऊन इमला एकटीचे नावे नमुना नं.८ ला नोंद करुन घेतला. सदर दाव्यामध्ये वादी यांचा १/४ हिस्सा व प्रतिवादी नं. १ ते ४ यांचा एकत्रात १/४ हिस्सा व प्रतिवादी क्र. ५ व ६ यांचा प्रत्येकी १/४ हिस्सा आहे.

०४. वादीचे पुढे असे कथन आहे की, ते व्यापारानिमित्त मुंबई येथे राहत असल्याने त्यांचे कुटुंबिय वर्षातून दोन वेळा दावा इमल्यामध्ये येऊन राहतात. मार्च २००९ मध्ये दावा इमल्यामध्ये वादी राहणेसाठी आले असता प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी वादीशी भांडण करुन तुमचा दावा मिळकतीशी कोणताही हक्कसंबंध नाही व दावा इमल्यामध्ये पाऊल ठेवायचे नाही अशी धमकी देऊन त्यांना दावा मिळकतीत येऊ दिले नाही. त्यावेळी वादीने नमुना नं.८अ चा उतारा ग्रामपंचायत भोमवाडी यांचेकडून घेतला असता इमल्याचे मालक म्हणून प्रतिवादी क्र.१ हिच्या नावाची नोंद मालक म्हणून दिसून आली. त्यावेळी वादीने दि.१६/०३/२००९ रोजी सरंपच, ग्रामपंचायत भोमवाडी यांचेकडे वारस म्हणून वादी व प्रतिवादी यांचे नावांची नोंद होणेकरीता अर्ज दिला. परंतु आजतागायत त्यावर कोणतीही कारवाई केलेली नाही. त्यामुळे वादीला प्रस्तुतचा दावा दाखल करणे भाग पडलेले आहे.

०५. प्रतिवादी क्र. १, ३, ४, ५ हे दाव्यात हजर होऊन देखील आपली कैफियत अभिलेखावर दाखल करणेस असमर्थ ठरले त्यामुळे प्रस्तुतचा दावा त्यांचेविरुध्द विना कैफियत चालविणेत आला.

०६. प्रतिवादी क्र. २, ६अ व ६क यांना दाव्याचे समन्स लागू होऊन देखील ते दाव्यामध्ये हजर झालेले नाहीत त्यामुळे प्रस्तुतचा दावा त्यांचेविरुध्द एकतर्फा चालविणेत आला. प्रतिवादी क्र. ६ब विरुध्द योग्य तजवीज न केलेने दावा खारीज झालेला आहे. परंतु

त्याचा दावा मिळकतीतील हक्क मयत प्रतिवादी क्र. ६ यांच्या अनुषंगाने असलेने त्यांच्या हक्कास बाधा येत नाही.

०७. वरील कथनांवरून खालील मुद्दे प्रस्थापित करण्यात आले असून त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसहीत खालीलप्रमाणे नोंदविले आहेत.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी शाबीत करतो का दावा इमला वादी व प्रतिवादी यांचा सामाईक कब्जे वहिवाटीचा आहे ? | होय. |
| २. | वादी त्याचे मागणीप्रमाणे दावा इमल्याचे वाटप होवून मिळणेस पात्र आहे का ? | होय. |
| ३. | काय आदेश व हुकूमनामा ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

**–:: कारणमिमांसा ::–**

०८. वादीने आपल्या कथनांच्या पुष्ठयर्थ नि. ७६ कडे वादीने कु. नॅन्सी व्हिसेंट घोन्साल्विस यांना लिहुन दिलेले कुलअखत्यारपत्र हजर केले आहे. **नि.७५** कडे कुलअखत्यारी कु. नॅन्सी व्हिसेंट घोन्साल्विस हिचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. तसेच मयत डॉमनिक घोन्साल्विस व लुईजा घोन्साल्विस यांचे दफन प्रमाणपत्र **नि.८५** व **नि.८६** कडे दाखल केलेले आहेत. तसेच **नि.५ लगत** ग्रामपंचायत भोमवाडी यांचेकडील नमुना नं.८ सन २००६ व २००७ चा असेसमेंट उतारा तसेच **नि.४/२** कडे मासिक सभा तारीख २६/०२/२००२ ची छायांकित प्रत व ग्रामपंचायत भोमवाडी यांचेकडे दि.१६/०३/२००९ रोजी दिलेल्या अर्जाची छायांकित प्रत दाखल केलेली आहे.

**मुद्दा क्र. १ व २ करीता: –**

०९. वादीच्या कथनाप्रमाणे दावा इमला क्र. ११५अ हा मूळचा डॉमनिक घोन्साल्विस यांच्या मालकीचा होता व त्यांचे मृत्यूनंतर सदरचा इमला हा त्यांची पत्नी लुईजा डॉमनिक घोन्साल्विस यांचे नावे नोंद होता. वादीने सदर व्यक्तीच्या नावाची नोंद असणारा कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. वादीने नि.८४ व नि.८५ कडे वर नमूद व्यक्तीचे दफन प्रमाणपत्र दाखल केलेले आहे. सदर कागदपत्रांचे अवलोकन केले असता डॉमनिक घोन्साल्विस हे दिनांक ०३/०२/१९६७ साली मयत झालेले असून त्यांना दिनांक ०४/०२/१९६७ साली दफन करण्यात आलेले आहे. तसेच लुईजा डॉमनिक घोन्साल्विस ही दिनांक ०४/१२/१९९४ रोजी मयत झालेली असून तिला दिनांक ०४/१२/१९९४ रोजीच दफन करण्यात आलेले आहे. दावा मिळकत सामाईक कब्जा वहिवाटीचे असलेबाबत वादीने नि.५ कडे नमुना नं.८ ची प्रत दाखल केलेली आहे परंतु सदर उताऱ्याप्रमाणे मालकाचे नाव हे मारी ॲन्थोनी घोन्साल्विस असे नमूद असून मालक सदरी नोंद केलेली आहे. प्रस्तुतकामी प्रतिवादी हजर होवून वादीचे दाव्यास हरकत नोंदविलेली नाही तसेच वादीतर्फे साक्षीदाराचा उलटतपासदेखील नोंदविलेला नाही. त्यामुळे, वादीची सरतपासातील कथने विना आव्हानित राहिलेली आहेत.

१०. निश्चितच दावा प्रतिवादींविरुध्द एकतर्फा किंवा विना कैफियत चालविणेत आला याचा अर्थ वादीचा दावा पूर्णपणे शाबीत झाला असे होत नाही. वादीने दाव्यातील कथने पुराव्यानिशी शाबीत करणे जरुरीचे आहे. वादीने दाखल केलेल्या कागदपत्रांमध्ये दावा इमला सामाईक कब्जे वहिवाटीचा आहे हे दाखवणारा कोणताही पुरावा नाही. परंतु नि.४/२ कडे

दाखल कागदपत्राचे अवलोकन केले असता, सदरचे कागदपत्र हे मासिक सभा २६/०२/२००२ रोजीच्या ठरावाच्या नकलेची छायांकित प्रत आहे. वादीने सदर कागदपत्र आपल्या पुराव्यात शाबीत केलेले नाहीत परंतु प्रतिवादी यांनी दाव्यात हजर होवून सदरचे कागदपत्र नाकारलेले नाही. त्यामुळे सदरचे कागदपत्र हे विना आव्हानित राहिलेले असलेने प्रतिवादी यांना मान्य असलेचे अनुमान काढता येईल करीता सदरचे कागदपत्र पुराव्यात वाचण्यात आलेले आहेत. सदर कागदपत्राचे अवलोकन केले असता सदरचा ठराव हा दि. २६/०२/२००२ रोजीच्या मासिक सभा ठरावाची प्रत असून त्यामध्ये श्रीमती मारी अंतोनी घोन्साल्विस यांचा ११५अ ही नावावर होणेबाबतचा विषय असून त्याप्रमाणे ठराव सर्वानुमते मंजूर केल्याचे दिसून येत आहे. त्यामध्ये इमारत क्रमांक ११५अ ही कै. लुईजा डुमिंग घोन्साळ हे मयत असून त्यांचा मुलगा ॲन्थोनी डुमिंग घोन्साळ हे सुध्दा मयत असून सदर इमारत यांची सून श्रीमती मारी ॲन्थोनी घोन्साळ यांचे नावावर करण्यास पंचायतीची हरकत नाही असे नमूद करण्यात आलेले आहे. याचाच अर्थ ग्रामपंचायत इमला क्रमांक ११५अ वादी यांनी कथन केल्याप्रमाणे लुईजा डॉमनिक घोन्साल्विस यांचे नावे असल्याची बाब शाबीत होत आहे. वादींच्या कथनाप्रमाणे त्यांना दाव्यात नमूद केलेप्रमाणे वारस आहेत. त्याकरीता वादी यांनी ग्रामपंचायतीकडे २००९ मध्ये अर्ज दाखल केलेला आहे.

११. मुळात ग्रामपंचायतीला मिळकतीच्या हस्तांतराबाबत ठरावाने निर्णय घेण्याचा कोणताही कायदेशीर अधिकार देण्यात आलेला नाही. ग्रामपंचायतीमधील मासिक ठरावाने एखाद्या व्यक्तीच्या नावे मिळकत हस्तांतरीत करता येणारी नाही. त्यामुळे ग्रामपंचायतीने केलेला सदरचा मासिक ठराव हा मुळातच बेकायदेशीर आहे. वादी यांनी दाखल केलेली

वंशावळ प्रतिवादी यांनी प्रस्तुत दाव्यात हजर होवून नाकारलेली नाही. त्यामुळे सदरची वंशावळ विश्वसनीय व गृहीत धरता येणारी आहे. वादी यांनी नमुद केलेल्या वंशावळीप्रमाणे व त्यांना भारतीय वारसा कायदा लागू होत असल्याने मिळकतीचे समान हिस्से होणारे आहेत. लुईजा डुमिंग घोन्साल्विस यांना अंतोनी, फ्रान्सिस, व्हिसेंट, फिलोमिना व लुसी असे कायदेशीर वारस आहेत व त्यापैकी फ्रान्सिस हा निर्वंश मयत झाल्याचे वादीचे कथन आहे. सदर कथनांना प्रतिवादी यांनी कोणत्याही प्रकारची हरकत नोंदविलेली नाही. त्यामुळे सदर मिळकतीमध्ये लुईजा डुमिंग घोन्साल्विस हिच्या मृत्यूनंतर तिचे त्यावेळी हयात असणारे वारस म्हणजेच अंतोनी, व्हिसेंट, फिलोमिना व लुसी यांचा प्रत्येकी १/४ हिस्सा असल्याची बाब शाबीत होत आहे. त्याप्रमाणे सदर मिळकतीचे वाटप होवून मिळणेस वादी व प्रतिवादी पात्र आहेत. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ व २ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. ३ करीताः</u>-**

१२. वादीने दावा इमला क्र. ११५अ, ग्रामपंचायत भोमवाडी, खालचावाडा, सावंतवाडी ही मिळकत त्यांची सामाईक कब्जे वहिवाटीची असल्याची बाब शाबीत केलेली असल्याने सदर मिळकतीमध्ये वादीचा १/४ हिस्सा व प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचा एकत्रात १/४ हिस्सा तसेच प्रतिवादी क्र. ५ व ६ यांचा प्रत्येकी १/४ हिस्सा असल्याचे शाबीत झाल्याने वादी त्याप्रमाणे इमल्यामध्ये पृथक कब्जा मिळणेस पात्र आहे. करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

-::**आदेश**::-

१. दावा खर्चासह मंजूर करणेत येतो.

२. वादीचा दावा इमला ११५ अ, ग्रामपंचायत भोमवाडी, खालचावाडा, सावंतवाडी मध्ये १/४ इतका हिस्सा आहे असे जाहीर करणेत येते.

३. तसेच दावा इमलामध्ये प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचा एकत्रात १/४ हिस्सा, तसेच प्रतिवादी क्र. ५ व ६ यांचा प्रत्येकी १/४ हिस्सा असलेचे जाहीर करणेत येते.

४. दावा मिळकतीचे वाटप करण्यासाठी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे कलम ५४ अन्वये हुकुमनामा जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग-ओरोस यांचेकडे पाठविणेत यावा.

५ येणेप्रमाणे प्राथमिक हुकुमनामा तयार करणेत यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित.)

KUMBHAR RANJANA GOVIND
Digitally signed by KUMBHAR RANJANA GOVIND
Date: 2026.05.07 18:11:16 +0530

स्थळ - सावंतवाडी (श्रीमती आर.जी.कुंभार )
दिनांकः- ०७/०५/२०२६ सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), सावंतवाडी.